**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Issue XXV (25) , Vol. I Dec. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
| --- | --- | --- |

**Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648**

# Curren Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**Dec. 20 Issue- 25 Vol. I**

**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Shaurya Publication , Latur**



Scanned by CamScanner

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Issue XXV (25) , Vol. I<br>Dec. 2020 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


## Index


1. Impact of Fruits And Vegetables In Covid-19 — 5
Deepak Karan, Vishwa Nath and Ravi Karan
2. Discovery and Remote Access Tools & Services in Libraries — 9
Devidas Eknathrao Dadpe
3. 'Effect of sugar mill effluent on water quality of Bore-well' — 14
Dr. A. V. Gaikwad
4. Administration of Green audit in Vasant Mahavidyalaya ,Kaij [M.S.] — 16
Hirve Babasaheb J.
5. Spirituality and Pandemic like Covid -19 — 20
Sonia Uttam Bairagi
6. Importance of Mahatma Gandhiji's Views on Sanitation — 26
Dr. Pandit Mahadeo Lawand
7. GST In India — 29
Dr. Pratap J. Phalphale Ananda Ramrao Sarange
8. साठोत्तरी हिंदी महिला कहानीकार और स्त्री विमर्श — 32
प्रा.डॉ. एकलारे चंद्रकांत नरसप्पा
9. मनरेगाच्या अंमलबजावणीत ग्रामसभेची भूमिका — 35
प्रा.सुनिल काशिराम राठोड , डॉ.व्ही.डी. गायकवाड
10. जॉन रॉल्सची 'न्यायाची संकल्पना' — 40
डॉ. संजय मारोतीराव कोनाळे
11. मीरा कांत कृत 'अंत हाजीर हो' नाटक में स्त्री जीवन — 44
प्रा. डॉ. एमेकर एन.जी.
12. 'कोरोना काळातील व्यायाम' — 46
प्रा. डॉ. भास्कर माने
13. 'कोरोना काळातील कविता' — 49
प्रा. डॉ. गोविंद काळे
14. आदिवासी जनजाति एक परिदृश्य — 55
डॉ. अमिता पाण्डेय
15. चौथीभिंत : रूपबंध आणि सांस्कृतिकता — 63
डॉ.सी.डी. कांबळे
16. अण्णाभाऊ साठे यांचे लोक संगीतातील योगदान — 67
प्रा. चंद्रशेखर हि. मेंडोले
17. कश्मीर प्रश्न और डॉ.बाबासाहब अम्बेडकर — 70
डॉ.मा.ना.गायकवाड
18. राष्ट्रीय एकात्मतेसाठी संगीताची भूमिका — 76
प्रा. ज्ञानेश्वर बोंपीलवार
19. पारधी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या : आव्हाने आणि उपाययोजना *(संदर्भ कळंब तालुका)* — 78
ईश्वर लक्ष्मण राठोड
20. Anna Bhau Sathe: A Humanitarian Littérateur — 82
Dr. Ramesh Achyutrao Landage
21. Present Education Scenario And Awareness — 91
Dr.Narendra Kumar Moharana




Scanned by CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XXV (25) , Vol. I Dec. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# पारधी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या : आव्हाने आणि उपाययोजना *(संदर्भ कळंब तालुका)*

**ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

---

**प्रस्तावना :**

आपल्या देशात वंचिताच्या शिक्षणाचा फार मोठा प्रश्न आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण पाहिजे तसे दिसून येत नाही. यामध्ये शिक्षणापासून आजही वंचित असलेला घटक म्हणजे वेगवेगळया ठिकाणी राहणारे, दऱ्या-खोऱ्यातील जीवन जगणारे, वेगवेगळया जाती जमातीचे लोक शिक्षणापासून कोसो दूर असल्याचे दिसून येते. यामध्ये पारधी सारख्या भटकंती करणाऱ्या जमाती तर शिक्षणापासून अलिप्त असल्याचे दिसून येतात. यासाठी शिक्षणाची प्रवेशद्वारे खुली करुन वाडी-वस्ती पर्यंत पोहचणे व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे अत्यंत गरजेचे आहे.

शिक्षण हे व्यक्ती व समाजाच्या भौतिक विकासाचे एक प्रमुख साधन आहेच, परंतु त्याबरोबरच ते व्यक्तीला सुसंस्कृत करण्याचे आणि व्यक्तिगत व सामाजिक जीवनाचा नैतिक स्तर वाढविण्याचे सर्वात प्रमुख माध्यम आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, व्यक्तिगत आणि राष्ट्रीय जीवन संपन्न करण्यासाठी शिक्षणाला नैतिक परिमाण देणे आणि स्पर्धेच्या युगातही सहकार्याची भावना वृध्दिंगत करुन एकविसाव्या शतकात भारत हे एक समर्थ राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर आणण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी भारतातील प्रत्येक राज्यातील जाती-जमातीच्या समूहाच्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल तयार करुन कोणत्या जाती-जमाती आजही शिक्षणापासून वंचित आहेत, अशा घटकाला प्रथमतः शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत संशोधन अभ्यासात उस्मानाबाद जिल्हयातील पारधी आदिवासी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या आणि त्यांच्या समोर असलेले विविध आव्हाने याचा अभ्यास करुन या जमातीचे समूळ परिवर्तन करणे गरजेचे आहे. पारधी जमातीमध्ये शिक्षण विषयक असलेला मागासलेपणा कमी करुन यांना मुख्य प्रवाहात आणल्यास या जमातीतील लोक देखील विकसित होतील आणि काही काळानंतर संपूर्ण समाज ही विकसित झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून पारधी जमातीच्या लोकांना अनेक समस्यातून मुक्त करीत असतानांच शैक्षणिकदृष्टया त्यांना सक्षम करणे व शिक्षणाच्या प्रवाहात सक्रिय करुन समाज परिवर्तनासाठी व विकसित समाज म्हणून पुढे येण्याची संधी देणे अत्यंत गरजेचे आहे.

पारधी जमातीचा फार वर्षा पूर्वीपासून ते आजच्या आधुनिक काळात देखील सामाजिक शोषणाची परंपरा कमी झालेली नाही, या जमातीतील लोकांना आजही गुन्हेगार म्हणूनच समजले जाते, कोणत्याही ठिकाणी चोरी झाल्यास चोर म्हणून पारधी लोकांनाच पोलिस वेठीस धरतात. या जमाती मध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त आहे तसेच यांना गाव पातळीवर कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत. शासनाला लागणाऱ्या आणि शासनाकडून मिळणाऱ्या दस्तऐवजांची पूर्तता सुध्दा त्या गावात केली जात नाही. मुळातच यांना कोणत्याही गावात राहण्यासाठी जागा दिली जात नाही. गावाच्या शेजारी शासनाच्या जागेवर अनधिकृतपणे आपले पत्र्याचे घर तयार करुन हे लोक राहत असल्याचे दिसून येते. यामुळे यांचा निश्चित ठिकाण देखील सांगता येत नाही, त्यामुळे त्यांचे मुलं-बाळ शिक्षणापासून नियमितपणे वंचित राहत असतात. यासाठी शासनाच्या व सरकारच्या माध्यमातून या जमातींच्या शिक्षणविषयक सुधारणेसाठी कठोर कार्यक्रमाची अमलबजावणी करुन परिवर्तन घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. पारधी जमातीच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.
२. पारधी जमाती - शैक्षणिक आव्हाने समजून घेणे.



Scanned by CamScanner

Issue XXV (25) , Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Dec. 2020 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार असून या शोध निबंधामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात संशोधनासाठी केला जाणार आहे. प्राथमिक स्त्रोताच्या साधनामध्ये मुलाखत अनुसूची या तंत्राच्या सहाय्याने तथ संकलन केले जाणार आहे.

कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या : आव्हाने आणि उपाययोजना, या विषयावर संशोधनात्मक लेख सादर करीत आहे. या अभ्यासासाठी कळंब तालुक्यातील प्रत्यक्ष १० पारधी वस्तीला भेटी देवून हा अभ्यास करण्यात आलेला आहे. यामध्ये पारधी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या : आव्हाने आणि उपाययोजना, या विषयावर अभ्यास केला जात आहे. यासाठी दुय्यम स्त्रोताचा देखील आधार घेतला जाणार आहे. दुय्यम स्त्रोत म्हणून प्रकाशित-अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी साधनांचा वार करण्यात येणार आहे.

**पारधी जमातीच्या शैक्षणिक मागासलेपणाची समस्या व कारणे :**

भारतातील जाती जमातींचा शैक्षणिक दर्जाचा अभ्यास केले असता असे स्पष्ट दिसून येईल की, आजच्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात देखील अनेक जाती जमाती शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसते. कारण की, अनेक जाती जमाती या दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे शाळा तसेच वेगवेगळया शैक्षणिक संस्था त्यांच्या पर्यंत पोहचलेल्या दिसून येत नाहीत. ज्या शाळा, संस्था या जाती जमाती पर्यंत पोहचलेल्या आहेत, त्या फक्त कागदोपत्रीच असल्याचे दिसून येतात. त्यात काही शाळा, संस्थेनी या जमातीच्या शैक्षणिक परिवर्तनासाठी कार्य करीत असल्याचे देखील दिसून येते. परंतु यांच प्रमाण हे अल्प असून ते वाढविणे गरजेचे आहे. जेव्हा प्रत्येक पारधी पिढीतील मुले शिक्षणाच्या प्रवाहामध्ये येतील तेव्हा खऱ्या अर्थाने या समाजात परिवर्तन झाल्याशिवाय राहनार नाही.

कळंब तालुक्यातील १० पारधी पिढीला प्रत्यक्ष भेटी देवून हा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक ठिकाणी शिक्षणासंदर्भात मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून प्रश्न विचारुन माहिती संकलित करण्यात आलेली आहे. संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे शिक्षण विषयक समस्या सविस्तरपणे मांडले जाणार आहे.

कुटुंबातील सदस्यांकडून मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाते का, असे १०० निवेदकांना विचारले असता २८ लोकांनी होय, ३६ लोकांनी, २० लोकांनी काही प्रमाणात तर १६ सदस्यांनी असहकार्याची भूमिका दाखवली आहे. यामुळे गाव पारधी जमातीचे साक्षर-निरक्षरतेचे प्रमाण देखील लक्षात येते. या जमातीचे साक्षरतेचे प्रमाण खुपच कमी असून वेगवेगळया वस्तीच्या प्रत्यक्ष पाहणी वरुन असे लक्षात येते की, या जमातीचे साक्षरतेचे प्रमाण २३ टक्के इतके असून निरक्षरता मात्र ७७ टक्के इतके आहे. यामुळे या जमातीचे शिक्षण क्षेत्रातील योगदान किती आहे, हे सहजपणे लक्षात घेता येते.

गाव पारधी जमातीच्या मुला-मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कुठीत कारस्थान काही वर्षापूर्वी इतर जाती जमातीच्या व्यवस्थापनातून होत होते. परंतु आज सर्व गावगाडयात शासनाच्या शाळा आलेल्या आहेत, परंतु आजही काही पारधी पिढीवर या शाळा दिसून येत नाही. ज्या काही शाळा आहेत त्या शाळा जर वस्ती पासून फार अंतरावर असेल तर पारधी पिढीतील मुले ज्या शाळेपर्यंत जावु शकत नाहीत. म्हणून यामुळे देखील या जमातीचे मुलं-मुली शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे दिसून येतात.

या जमातीतील मुलांना कोणत्या अडचणी येतात असे विचारले असता, ३६ टक्के निवेदकांनी भाषा कळत नाही असे म्हटले तर ३७ टक्के निवेदकांनी शिकविलेले समजत नाही असे सांगितले व इतर २७ टक्के निवेदकांनी आमच्या जमातीतील लोकांची शिकविण्याची व मुलांची शिकण्याची मानसिकता नसते, असे प्रतिउत्तर दिले. यावरुन देखील हे स्पष्ट होते की, या जमाती मध्ये शिक्षणाविषयी आणखी अनभिज्ञता असल्याचे दिसून येते.

हंगामी स्थलांतर करतात तेव्हा या जमातीतील मुलांना शिक्षणापासून काही काळ दुर राहावे लागत असते. कारण की, जेव्हा हे लोक स्थलांतर करतात तेव्हा त्या त्या कुटुंबासोबत ४० टक्के मुले जातात, २६ टक्के मुले आपल्या नातेवाईकांकडे राहतात तर २२ टक्के निवासी शाळा मध्ये जाऊन राहायला लागतात तर १२ टक्के मुले हे



Scanned by CamScanner

Issue XXV (25) , Vol. I Dec. 2020 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139


शासकीय वसतीगृहात राहण्यासाठी जातात. अशा पध्दतीने या जमातीच्या मुला-मुलींचे शिक्षण चालत आहे. या प्रक्रियेत बदल झाल्याशिवाय हा समाज मुख्य प्रवाहात येऊ शकत नाही.

शासन व सरकारच्या माध्यमातून या जमातीचा शैक्षणिक मागासलेपणा कमी करण्यासाठी सर्व स्तरातून वेगवेगळे उपक्रम राबवून प्रयत्न करणे गरजेचे आहे. या जमातीच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी विशेष शैक्षणिक सुविधा व शिष्यवृत्ती जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करुन दिल्यास व शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना मोठया संधी दिल्यास या जमातीचा देखील शैक्षणिक मागासलेपणा कमी करता येईल. निवेदकांना विशेष शैक्षणिक सुविधा व शिष्यवृत्ती या संदर्भात विचारले असता, ४८ टक्के निवेदकांनी गरज असल्याचे सांगितले तर १२ टक्के निवेदकांनी नाही असे म्हटले परंतु हे लोक शैक्षणिकदृष्टया मागासलेले असल्याचे दिसून येते. २४ टक्के निवेदकांनी काही प्रमाणात गरज असल्याचे म्हणतात तर १६ निवेदकांनी अत्यंत आवश्यकता असल्याचे स्पष्टपणे नमुद केले आहे. यावरुन या जमातीच्या शिक्षण क्षेत्रातील प्रगती करावयाचे असेल तर त्यांना शैक्षणिक सुविधा व शिष्यवृत्ती जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करुन दिल्यास हा समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल असे या अभ्यासावरुन म्हणता येईल.

उस्मानाबाद जिल्हयातील कोणत्याही तालुक्यातील गाव पारधी जमातीचा अभ्यास केल्यास हे चित्र स्पष्ट दिसून येईल की, या जमातीचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान कमी असल्याचे दिसते. कारण की या जमातीतील लोक हे शिक्षणाला फारसे महत्व देत नव्हते, आजही अनेक कुटुंबात शिक्षणाला पाहिजे त्या प्रमाणात स्विकारु शकत नाहीत, आपल्या कुटुंबातील शिक्षण घेण्यास इच्छूक असणाऱ्या बालकांना देखील शिक्षणासाठी असमर्थता दर्शविण्याची शक्यता जास्त प्रमाणात आढळून येईल. पारधी जमातीत शिक्षणाच्या बाबतीत मागासलेपणा असल्याचे स्पस्ट असताना या जमातीतील प्रत्येक कुटुंबाची शिक्षणविषयक जाणीव-जागृती होणे काळाची गरज असल्याचे दिसून येते. तेव्हाच या समाजात शैक्षणिक परिवर्तन होऊ शकेल. शैक्षणिक परिवर्तन झाल्यास हा समाज अंधश्रध्दा व पारंपारिक प्रथा-परंपरेतून बाहेर येतील आणि नव विज्ञानवादी विचारांचा स्विकार करुन समाज परिवर्तनासाठी स्वतःचा लढा उभारुन काही काळानंतर समग्र पारधी जमातीचे लोक समुदाय निश्चितच विकासाच्या केंद्रस्थागी येण्यास या जमातीचे लोक तयार झालेले दिसून येतील. म्हणून पारधी जमातीच्या लोकांना शिक्षणासाठी प्रोत्साहन करुन मार्ग दाखविणे महत्वाचे असल्याचे दिसून येते.

**पारधी जमाती - शैक्षणिक आव्हाने :**

स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर काळात देखील सतत गुन्हेगार जमाती म्हणून लागलेला कलह आजही कमी झालेला नाही, अशा परिघाच्या बाहेर असलेल्या जमाती मध्ये शैक्षणिक स्थित्यंतरे घडवून आणणे तितकेच गरजेचे आहे. परंतु समग्र समाज व्यवस्थेत या जमातीकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलेला नाही, तर यांना समक्ष करण्यासाठी कोणत्याच उच्चभ्रु जाती समूहाला नकोसे वाटणारेच आहे. म्हणून आजही या जमाती समोर शैक्षणिक क्षेत्रातील फार मोठे आव्हाने असून त्या आव्हानांना या जमातीचे लोक तोंड देत असतांना दिसून येते.

१. शैक्षणिक विकासात वेगवेगळया जाती जमातीच्या तुलनेत असमतोल दिसून येतो.
२. शिक्षणासाठी प्रवेश देण्याच्या संदर्भात स्त्री-पुरुष अशा प्रकारची विषमता दिसून येते.
३. प्राथमिक शाळेतील शिक्षणाची गळती या जमातीच्या मुलांची रोखता आलेली नाही, त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहण्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.
४. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात शिक्षणाच्या बाबतीत मागासलेपणा दिसून येतो, त्यातही या जमातीच्या बाबतीत हे प्रमाण जास्त असल्याचे स्पष्ट दिसून येतात.
५. या जमातीसाठी स्वतंत्र शिक्षण विभागाची निर्मिती करुन त्यांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.
६. पारधी जमातीतील युवकांना व्यावसायिक शिक्षणासाठी भरीव अशी संधी दिली नाही तसेच त्यांना शैक्षणिक खर्चाची भरपूर अशी मदत केले जात नाही.
७. आदिवासी पारधी जमाती मध्ये साक्षरतेपेक्षा निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे बेरोजगारी, दारिद्रय हे शिक्षण व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे.

अशा प्रकारे अनेक आव्हाने पारधी जमाती समोर असल्याचे दिसून येते.

Scanned by CamScanner

| Issue XXV (25) , Vol. I<br>Dec. 2020 | Peer Reviewed<br>SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
| --- | --- | --- |

**उपाययोजना :**

महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्यातील असो अथवा कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या समोर असलेल्या शिक्षण विषयक आव्हाने कमी करण्यासाठी सर्व स्तरातून वेगवेगळया स्वरुपातून विविध उपक्रम राबवून शैक्षणिक समस्यातून या जमातीला मुक्त करता येईल. यासाठी महत्वपूर्ण कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

१. गुन्हेगार जमातीचे लोक म्हणून न समजता भारतीय जाती जमातीचे लोक अशी वागणूक मिळणे.
२. सर्वसामान्य लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन या जमाती विषयी बदलणे गरजेचे आहे.
३. शैक्षणिक क्षेत्रातील पारधी जमातीच्या मुलांची गळती थांबविणे.
४. स्वतंत्र शिक्षण विभागाची निर्मिती करुन शिक्षणाची संधी वेगवेगळया ठिकाणी उपलब्ध करुन देणे.
५. व्यावसायिक शिक्षणासाठी भरीव अशी तरतुद करुन शिष्यवृत्तीच्या माध्यमातून त्यांना उपलब्ध करुन देणे.
६. पारधी समाजातील लोकांमध्ये शिक्षणविषयक जाणीव-जागृती करुन निरक्षरता कमी करण्याचे प्रयत्न करणे.
७. सर्व स्तरातून शिक्षण घेणाऱ्या पारधी जमातीच्या मुला-मुलीचे स्वागत करुन त्यांना शिक्षणाविषयी प्रोत्साहित करणे अत्यंत गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

डॉ. भालचंद्र मुणगेकर शिक्षणाच्या संदर्भात असे म्हणतात की, शिक्षण हे व्यक्ती व समाजाच्या भौतिक विकासाचे एक प्रमुख साधन आहेच, परंतु त्याबरोबरच ते व्यक्तीला सुसंस्कृत करण्याचे आणि व्यक्तिगत व सामाजिक जीवनाचा नैतिक स्तर वाढविण्याचे सर्वात प्रमुख माध्यम आहे. म्हणून शिक्षणाने समाजाला निश्चित दिशा प्राप्त होत नाही, त्या करीता शिक्षणाने समाज समृध्द होते हे लक्षात घेवून पारधी समाज असेल अथवा कोणताही समाज, त्या समाजातील मागासलेपणा कमी करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय त्याला तरणोपाय नाही, असेच म्हणावे लागेल.

**संदर्भग्रंथ :**

१. पवार दिपक (२०१४), पारधी समाजाचे अंतरंग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. गारे गोविंद (२०००), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.
३. चव्हाण दिलीप (२००७), स्त्री शिक्षणाचा संघर्ष, क्रातीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी मंच, पुणे.
४. एम. कुमार (२००९), आदिवासी संस्कृति एवं राजनीति, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
५. चव्हाण रामनाथ (२००८), भटक्या विमुक्तांची जात पंचायत, देशमुख आणि कं. पब्लिशर्स, पुणे.
६. राठोड मोतीराज (२०१२), गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम, निर्माण संस्था, अश्मक प्रकाशन, पुणे.
७. भोसले नारायण (२००८), भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत- पंरपरा आणि संघर्ष, द ताईची प्रकाशन, पुणे.
८. मेंढेकर दत्तात्रय (२०१०), दिशा शिक्षणाच्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
९. जाधव रवि, गायकवाड गौतम (२०१५), शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
१०. कांबळे नारायण (२०१३), उच्च शिक्षणापुढील आव्हाने, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.



Scanned by CamScanner